# पुणे विद्यापीठ पुणे

## एम.ए. मराठी '८५ पॅटर्न'

## १९८९-९० व ९०-९१ साठी

## एम.ए. मराठी अभ्यासक्रम '८५ पॅटर्न'

# संक्षिप्त आराखडा


भाग १

प्रश्नपत्रिका १ : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्रारंभ ते इ.स.१८१८ : — पृ. ३ ते ५

सामान्य स्तर

प्रश्नपत्रिका २ : साहित्यविचार : — पृ. ५ ते ९

विशेष स्तर

प्रश्नपत्रिका ३ : मराठीचा भाषिक अभ्यास : — पृ. ९ ते ११

विशेष स्तर

प्रश्नपत्रिका ४ : ऐच्छिक विषय :

विशेष स्तर

अलंकार आणि छंद : — पृ. ११ ते १३

किंवा

१९४५ नंतरचे वाङ्मयीन प्रवाह : — पृ. १४ ते १५

किंवा

लोकसाहित्य व मराठी लोकसाहित्य : — पृ. १५ ते १७

किंवा

मराठीचे पारंपरिक व्याकरण : — पृ. १७ ते १९

## भाग २


प्रश्नपत्रिका ५ : नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास : पृ. १९ ते २०

सामान्य स्तर

प्रश्नपत्रिका ६ : समीक्षाविचार आणि साहित्यसमीक्षा : पृ. २१ ते २४

विशेष स्तर

प्रश्नपत्रिका ७ : लेखकाचा अभ्यास (प्राचीन / अर्वाचीन) : पृ. २४ ते २६

विशेष स्तर

किंवा

साहित्यप्रकाराचा अभ्यास : पृ. २६ ते २७

प्रश्नपत्रिका ८ : ऐच्छिक विषय : सौंदर्यशास्त्र : पृ. २७ ते २९

विशेष स्तर

किंवा

मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते इ.स.१९६०) : पृ. २९ ते ३१

किंवा

निबंध लेखन : पृ. ३१ ते ३४

किंवा

लेखन विद्या : तत्त्व आणि व्यवहार : पृ. ३४ ते ३५

किंवा

ग्रामीण साहित्य व दलित साहित्य : पृ. ३५ ते ३८

महत्वाची सूचना पृ.३८

## एम.ए. च्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

विद्यार्थ्यांची -

१. चिकित्सक अभ्यासाची क्षमता वाढविणे.

२. साहित्याच्या व्यवच्छेदक लक्षणाबाबत विचाराची आणि वाङ्मयीन मूल्यमापनाच्या दृष्टीची समज वाढविणे.

३. (अ) साहित्याभ्यासाच्या संदर्भात विवेच्य विषयांची आणि त्यांच्या प्रस्तुताप्रस्तुततेची जाण निर्माण करण्यास मदत करणे.
(आ) अशा विषयांच्या चिकित्सेची समज वाढविणे.

४. (अ) विशिष्ट कालखंडातील साहित्याच्या अभ्यासाच्या व्याप्तीबाबत जाण निर्माण होण्यास मदत करणे.
(आ) अशा व्याप्तीने अभ्यास करण्याची क्षमता वाढविणे.

५. (अ) समग्र लेखक म्हणून साहित्यिकाच्या अभ्यासाच्या दिशांची समज निर्माण होण्यास मदत करणे.
(आ) अशा अभ्यासाची क्षमता वाढविणे.

६. (अ) साहित्यकृतींच्या, साहित्यप्रकारांच्या आणि साहित्यिकांच्या तौलनिक अभ्यासाबाबत दिशा, व्याप्ती आणि मर्यादा यांची समज निर्माण होण्यास मदत करणे.
(आ) अशा अभ्यासाची क्षमता वाढविणे.

७. (अ) साहित्यविषयी प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक, भारतीय व पाश्चात्य विचारांबाबत समज वाढविण्यास मदत करणे.
(आ) अशा विचारांचा सूक्ष्म, विश्लेषक व चिकित्सक अभ्यास करण्याची क्षमता वाढविणे.

८. समीक्षा, उपयोजित समीक्षा आणि अभ्यासीन समीक्षा याविषयी -
(अ) समज निर्माण होण्यास मदत करणे.
(आ) अशा पध्दतीने समीक्षा करण्याची क्षमता वाढविणे.

९. भाषेचे विविध व्यवहार आणि साहित्याच्या संदर्भातील भाषाव्यवहार याविषयी आकलनाची क्षमता वाढविणे.

१०. (अ) लेखन-संपादन, लेखन-विद्या, भाषांतर, रूपांतर या प्रक्रियांविषयी आणि त्या संबंधीच्या समस्यांविषयी माहिती देणे.
(आ) या सर्व विषयांच्या संबंधात समज वाढविणे.
(इ) वरील सर्व प्रकारचे लेखन करता यावे म्हणून प्रात्यक्षिके करून घेणे.

### प्रश्नपत्रिका क्रमांक १ : सामान्य स्तर

### मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते इ.स. १८१८)

**उद्देश :**

साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा, लेखक-कवींची व्यक्तित्वे, समकालीन समाज, त्याविषयी लेखक-कवींचे भान, या सर्वांचे साहित्यकृती, साहित्यिक, साहित्यप्रकार, साहित्यविशेष यांवर झालेले परिणाम लक्षात घेऊन वाङ्मयेतिहास-संकल्पनेच्या संदर्भात साहित्य आणि साहित्यकार यांच्या विशेषांची चर्चा करणे. अशा चर्चेद्वारा ऐतिहासिक संदर्भात आणि वाङ्मयपरंपरेत साहित्यनिर्मितीचे स्वरूप आणि साहित्यिकांचे कार्य, यांचे भान आणून देणे.

टीप : - ग्रंथकाळ - संशोधन, ग्रंथकाराचे चरित्र यासंबंधीच्या वादांची तपशीलवार माहिती व विवेचन अपेक्षित नाही.

**पहिली सहामाही** - प्रारंभकाल ते इ.स.१६०० :

१. कोरीव लेख आणि इतर ग्रंथ यांमधून मराठी साहित्याची परंपरा लक्षात घेण्यासाठी उपयुक्त माहितीचे स्वरूप विशद करणे

२. मुकुंदराजांची काव्यनिर्मिती : प्रेरणा व स्वरूप, आद्यत्वासंबंधी वाद.

३. महानुभावांची वाङ्मयनिर्मिती : प्रेरणा, स्वरूप, ऐतिहासिक महत्त्व आणि मराठी वाङ्मय परंपरेतील स्थान (गद्य आणि पद्य)

४. ज्ञानेश्वरांची काव्यनिर्मिती : प्रेरणा, स्वरूप, कार्य, आद्यत्वासंबंधी वाद, तत्कालीन आणि मराठी वाङ्मय-परंपरेत स्थान

५. नामदेवांची काव्यनिर्मिती : प्रेरणा , स्वरूप, कार्य, तत्कालीन आणि मराठी वाङ्मयपरंपरेत स्थान

६. 'ज्ञानेश्वरांच्या प्रभावळी' तील म्हणून मानता येतील अशा कवी-कवयित्रींची काव्यनिर्मिती : स्वरूप आणि वैशिष्ट्ये

७. (१) चोंभा : उद्धाहरण : ऐतिहासिक महत्त्व
(२) सरस्वती गंगाधर : गुरूचरित्र : ऐतिहासिक महत्त्व

८. एकनाथांची काव्यनिर्मिती : प्रेरणा, स्वरूप, कार्य आणि तत्कालीन आणि मराठी वाङ्मयपरंपरेत स्थान

९. दासोपंतांची काव्यनिर्मिती : प्रेरणा, स्वरूप, कार्य आणि तत्कालीन व मराठी वाङ्मयपरंपरेतील महत्त्व :

१०. १६ व्या व १७ व्या शतकांतील ख्रिस्ती साहित्य: फादर स्टीफन्स-ख्रिस्त पुराण : ऐतिहासिक महत्व

**दुसरी सहामाही** - इ.स.१६०० ते इ.स.१८१८ :

१. तुकारामांची काव्यनिर्मिती : प्रेरणा, स्वरूप, कार्य आणि तत्कालीन व मराठी वाङ्मयपरंपरेतील महत्त्व

२. रामदास आणि रामदासी कवी : काव्यनिर्मितीची प्रेरणा, तिचे स्वरूप, तिचा संप्रदाय, संबंध आणि तत्कालीन व मराठी वाङ्मय-परंपरेतील स्थान

३. मुक्तेश्वर-श्रीधरांची काव्यनिर्मिती : प्रेरणा, स्वरूप, कार्य, तत्कालीन व मराठी वाङ्मयपरंपरेतील स्थान

४. पंडित कवींची (वामनपंडित, रघुनाथपंडित, सामराज, मोरोपंत इ.) काव्यनिर्मिती : परंपरा, प्रेरणा, स्वरूप, कार्य, तत्कालीन आणि मराठी वाङ्मयपरंपरेतील स्थान

५. महीपती, मध्वमुनी, अमृतराय, इ. च्या रचनांचे तत्कालीन व मराठी वाङ्मय - परंपरेतील स्थान .

६. बखरवाङ्मय : प्रेरणा, स्वरूप, कार्य, ऐतिहासिक आणि मराठी गद्यवाङ्मय परंपरेतील महत्त्व

७. ऐतिहासिक पत्रव्यवहार : गद्य साहित्यातील महत्व, वाङ्मयीन गुणांची चर्चा

८. शाहिरांची निर्मिती (पोवाडे, लावण्या इत्यादी) : प्रेरणा स्वरूप, विशेष कार्य, ऐतिहासिक आणि मराठी वाङ्मयपरंपरेत स्थान

**संदर्भ ग्रंथ :**

१. महाराष्ट्र सारस्वत : वि.ल.भावे, शं.गो.तुळपुळे

२. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १, २, ३ - ल.रा.पांगारकर

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ ते ७ - डॉ.अ.ना.देशपांडे

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १,२,३ - प्रकाशक - महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे

५. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप - प्रा. ह.श्री.शेणोलीकर

६. पाच संतकवी (आवृत्ती तिसरी) - शं.गो.तुळपुळे

७. प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा - श्री. रं. कुलकर्णी

८. प्राचीन मराठी पंडिती काव्य : डॉ. के.ना.वाटवे

९. मराठी लावणी वाङ्मय - डॉ.गंगाधर मोरजे (मेघ प्रकाशन)

१०. मऱ्हाटी लावणी (या ग्रंथाची प्रस्तावना) - म.वा.धोंड

११. मराठी कवितेचा उष:काल - श्री.म.वर्दे

१२. संत,पंत,तंत - श्री.म.माटे

१३. मराठी बखरवाङ्मयाचा पुनर्विचार - गं.ब.ग्रामोपाध्ये

१४. बखरवाङ्मय - र.वि.हेरवाडकर

१५. मराठी बखरवाङ्मय : उद्गम व विकास - डॉ.बापूजी संकपाळ

१६. मराठी खिस्ती वाङ्मय -(फादर स्टीफन्स ते १९६०) डॉ.गं.ना.मोरजे, अहमदनगर कॉलेज प्रकाशन

## प्रश्नपत्रिका २ : विशेष स्तर

## साहित्यविचार: भारतीय व पाश्चात्य

**उद्देश :**

१. महत्वाच्या पौर्वात्य व पाश्चात्य साहित्य -सिध्दान्तांचे स्वरूप जाणून घेणे,त्यांची वर्तमानकालीन प्रस्तुतता-अप्रस्तुतता लक्षात घेणे आणि साहित्याचे स्वरूप विविध अंगांनी स्पष्ट करून घेणे.

२. आवश्यक तेथे पौर्वात्य व पाश्चात्य साहित्यसिध्दान्तातील साम्यभेद ओळखण्याची क्षमता निर्माण करणे.

३. साहित्याकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची क्षमता वाढविणे.

४. समीक्षा-विचार आणि साहित्य समीक्षा-व्यवहार समजावून घेण्यासाठी भूमिका तयार करणे.

## साहित्यविचार

## भारतीय साहित्यविचार आणि पाश्चात्य साहित्यविचार

पहिली सहामाही : भारतीय साहित्यविचार

भूमिका : भारतीय साहित्यविचाराचे महत्त्व

भारतीय साहित्यविचार समजावून घेण्याची आवश्यकता

(अ) भारतीय साहित्यविचारातील काही महत्वाचे सिद्धांत

१. अलंकार- विचार

अलंकार म्हणजे काय ? अलंकाराच्या मुळाशी असलेले तत्व: अतिशयोक्ती, वक्रोक्ती, औपम्य, अप्रस्तुतप्रशंसा, चमत्कृती

अलंकार आणि लक्षणा, अलंकार आणि गुण, अलंकार आणि प्रतिमा, अलंकाराचे काव्यातील स्थान

२. वक्रोक्तिविचार

वक्रोक्तिस्वरूप : भामह व कुंतक यांचे यासंबंधीचे विचार, वक्रोक्ती आणि स्वभावोक्ती, वक्रोक्ती आणि दण्डीची अग्राम्यता.

कुंतकाने सांगितलेले वक्रोक्तीचे प्रकार, वक्रोक्तीचा रसाशी संबंध.

३. रीतिविचार

वामनाची रीति-संकल्पना, गुण व रीती संबंध, रीती-प्रकार,

दण्डी व कुंतक यांचा मार्गविचार, रीतीचा रसाशी संबंध.

४. ध्वनिविचार

ध्वनीचे स्वरूप-व्यंजना व्यापारासह, ध्वनीचे प्रकार, ध्वनी आणि रस.

५. रस-विचार

भरताचे रससूत्र, रस-भाव संबंध, रसाची स्थायी विलक्षणता-अलौकिकता.

रसप्रक्रिया-साधारणीकरणाची संकल्पना, रसविघ्ने, भरताची रसव्यवस्था.

६. औचित्य-विचार : आनंदवर्धन व क्षेमेंद्र यांनी केलेला औचित्यविचार.

(आ) ज्ञानदेव आणि रामदास यांचे काव्यस्वरूप व काव्यप्रयोजन यासंबंधीचे विचार.

(इ) (१) रवीन्द्रनाथ टागोर यांचे कला व कलावंताचे व्यक्तित्व यासंबंधीचे विचार.

(२) योगी अरविंद यांचे काव्यस्वरूप या विषयावरील विचार

**दुसरी सहामाही :**

(अ) पाश्चात्य साहित्यविचार

भूमिका : पाश्चात्य साहित्यविचार समजावून घेण्याची आवश्यकता; पाश्चात्य साहित्य विचारातील काही महत्त्वाचे सिध्दान्त.

(१) अनुकृती सिध्दान्त : - अनुकृती म्हणजे काय ?

कलाकृतीतील वास्तव चित्रणाचे किंवा जीवनचित्रणाचे स्वरूप, कलाकृतीचे संघटन तत्व, माध्यम विचार, साहित्य प्रकार.

(२) भव्योदात्ततेचा ( Sublime) सिध्दान्त

(३) अविष्कारवादी सिध्दान्त : -

सौन्दर्यानुभवाचे स्वरूप (निरपेक्ष आनंद, संकल्पनारहितता, निश्चित हतूचा अभाव, स्वयंशासितता, इंद्रियगोचरता).

सौन्दर्याच्या दोन जाती : स्वायत्त व परायत्त सौन्दर्य, कला व निसर्ग यांतील फरक .

प्रातिभ ज्ञानाची (Intuition) संकल्पना, अनुभव व त्याचा आविष्कार (अभिन्नता), कलात्मक अनुभवाची अनन्यसाधारणता.

वाङ्मय प्रकाराबाबतची भूमिका, माध्यमविचार, कलाकृतीच्या प्रतवारीचा प्रश्न.

(४) रूपविषयक सिद्धान्त : - रूप या संकल्पनेचे साहित्याच्या संदर्भातील अर्थ, सेंद्रियत्व (Organic Unity) पदसंदर्भता (Contextuality) आणि अनेकार्थता (Polysemy).

अनेकतेतील एकता, विरोधाभासता (Language of paradox), लयनिष्ठता, रूपाच्या संदर्भात तंत्र व शैली यांचा विचार.

(ख) साहित्य आणि समाज यांमधील संबंधाबाबतचे विचार -

साहित्य आणि समाज यांमधील संबंधाची मार्क्सवादी मीमांसा, पायाभूत उत्पादन पद्धती व आर्थिक संबंध आणि उदित होणारे कलाप्रकार यांचा अन्योन्य संबंध (base and super structure), पुरोगामी साहित्याची संकल्पना.

(क) साहित्य आणि जीवनदृष्टी : -

जीवनदृष्टीचा अर्थ व तिचे कलात्मक अनुभवांचे व त्यांच्या अभिव्यक्तीचे विशेष, पुढील जीवनदृष्टीच्या संदर्भात:

(१) अभिजाततावादी, (२) स्वप्नरम्यतावादी, (३) वास्तववादी,

(४) अतिवास्तववादी, (५) अस्तित्ववादी, (६) आत्मिकतावादी. ( Spiritualist)

## संदर्भग्रंथांची सूची

### भारतीय साहित्य विचार


१. भारतीय साहित्यशास्त्र (तिसरी आवृत्ती) - ग.त्र्यं. देशपांडे

२. प्राचीन काव्यशास्त्र - र.पं.कंगले

३. रसभाव विचार - र.पं.कंगले - सा.सं.मंडळ प्रकाशन

४. संस्कृत साहित्यशास्त्राची प्रस्तावना - गो.के.भट

५. भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रांती - वा.के.लेले

६. साहित्यविचार - दि.के.बेडेकर

७. सौन्दर्याचे व्याकरण - सुरेंद्र बारलिंगे

८. मराठीचे साहित्यशास्त्र - मा.गो.देशमुख

९. मराठीचे साहित्यशास्त्र - (रामदास ते रामजोशी) - उषा मा. देशमुख

१०. रामदासांचे साहित्यशास्त्र - भा. श्री. परांजपे

११. टागोर साहित्य-कला विचार - (संपा.) अ.के.भागवत - डायमंड बुक स्टॉल, सांगली १९६१

१२. Personality - Ravindranath Tagore - Macmillan, 1970 Reprint

१३. The future poetry and letters on Poetry, Literature and Art - Shri Aurobindo - Shri Aurobindo Ashram, Pondicherey, 1972

१४. Tagore Centenary Volume - साहित्य अकादमी प्रकाशन

१५. साहित्य सिध्दान्त (अनुवादित) - स.गं.मालशे

१६. रसमीमांसा - यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे


## पाश्चात्य साहित्यविचार


१. सौंदर्यमीमांसा - रा.भा.पाटणकर

२. ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र - गो.वि.करंदीकर

३. सौंदर्य आणि साहित्य - बा.सी.मर्ढेकर

४. सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य - शरच्चंद्र मुक्तिबोध

५. मार्क्सवादी साहित्यविचार - के.रं.शिरवाडकर

६. 'समीक्षेची नवी रूपे' या पुस्तकातील 'काव्याची सहसर्जक भाषा' हा निबंध - गंगाधर पाटील

७. वाङ्मयीन वाद - म.सा.परिषद प्रकाशन

८. टीकाविवेक - श्री.के.क्षीरसागर

९. मराठी शैली विचार - अशोक केळकर / रमेश धोंगडे

१०. मराठी भाषा आणि शैली - रमेश धोंगडे / अश्विनी धोंगडे

११. साहित्याची भाषा - भालचंद्र नेमाडे

१२. 20th Century Literary Criticism, David Lodge (ed.), Longman, London, 3rd Impression, 1976 -

१३. Theories of Literature in the Twentieth Century, Douwe Folkhma & Elrud Ibsch C.Hurst & Co., London, 3rd Impression, 1986, Paper back

१४. Modern Literary Theory - Ann Jefferson & David Reobey (ed.) - Bats Ford Academic and Educational Ltd., London, 1982

१५. Literary Criticism : A Short History- William K.Wimsat & Cleanth Brooks

लोंजायनसवरील प्रकरण, रिचर्डसची प... र्थता, (Contexuality), एम्पसनची अनेकार्थता, (Polysemy)

(टीप : - पुस्तक क्रमांक १२ मधील The Lan... of Paradox Marxism and Literature Technique on Discovery, Realism and the Contemporary Novel Romanticism and Classicism हे निबंध पाहावेत.)

पुस्तक क्रमांक १३ व १४ मधील - साम्यवाद व मार्क्सवाद, जीवनदृष्टी, मतप्रणाली यांसाठी आवश्यक तो भाग

१६. 'अस्मिता महाराष्ट्राची' मधील 'गेल्या पंचवीस वर्षातील वाङ्मयीन वाद' प्रा. वसंत दावतर यांचा लेख - संपा. भीमराव कुलकर्णी

१७. 'स्वातंत्र्य व कला' हा लेख अनुष्टुभ, जुलै-ऑगस्ट, १९८१ मध्ये (अस्तित्ववादी दृष्टिकोणासाठी) - गंगाधर पाटील

१८. गां... तत्त्वज्ञान : वि.ना.ढवळे

## प्रश्नपत्रिका ३ : विशेष स्तर

## मराठीचा भाषिक अभ्यास

**उद्दिष्टे :**

१. भाषेच्यासंबंधी तौलनिक चर्चा करून भाषाव्यवहाराचे स्वरूप समजावून घेणे.

२. भाषाअभ्यासाच्या विविध कक्षा कोणत्या असतात ते जाणून घेणे.

३. भाषेची समग्रव्यवस्था म्हणजे काय ते जाणणे.

(अ) स्वनिमविश्लेषणाची तत्त्वे व तंत्र समजावून घेणे.

(आ) रूपिमविश्लेषणाची तत्त्वे व तंत्र तसेच वाक्यविश्लेषणाचे स्वरूप समजावून घेणे.

४. अर्थविन्यासाचे स्वरूप व अर्थाचे प्रकार यासंबंधीचे ज्ञान प्राप्त करणे.

५. भाषिक परिवर्तनाचे सर्वांगीण स्वरूप समजावून घेणे.

६. मराठीचा उगमकाल यासंबंधीची मतमतांतरे जाणणे.

७. मराठीचा कालिक अभ्यास कालविभागणीसह कसा केला जातो ते समजावून घेणे.

८. भाषाकुलाच्या संकल्पनेसह जागतिक भाषांचे वर्गीकरण आणि मराठीचे त्यातील स्थान हे विषय समजावून घेणे.

९. वर्णनात्मक व ऐतिहासिक भाषाभ्यास पध्दतींची मराठीच्या संदर्भात वैशिष्ट्ये जाणून घेणे.

## पहिली सहामाही

## मराठीचा भाषिक अभ्यास (वर्णनात्मक)

१. (अ) भाषेच्या संदर्भातील तौलनिक विचार : भाषा व भाषेतर संज्ञापन (Communication) यांतील भेद, भाषा व भाषण यांतील भेद, उच्चार व लेखन यांतील भेद, व्यवहाराची भाषा व साहित्याची भाषा यांतील भेद

(आ) भाषाभ्यासाच्या विविध कक्षा : समाजभाषाविज्ञान, बोलीभूगोल, कोशविज्ञान, मानववंशशास्त्र व भाषाविज्ञान, तात्त्विक व उपयोजित भाषाविज्ञान.

२. भाषेची समग्र व्यवस्था :

(अ) स्वनिमविश्लेषणाची तत्वे व तंत्र .

व्यवच्छेदक विनियोग, पूरक विनियोग, मुक्त परिवर्तन, काटकसरीचे तत्व, खंडित स्वनिम, खंडिताधिष्ठित स्वनिम, नासिक्यरंजन, बलाघात, सुरावली

(आ) व्याकरण : १. रूपिम विश्लेषणाची तत्वे व तंत्र :

व्याकरणिक प्रवर्ग-प्रत्ययात्मक (लिंग, वचन, विभक्ती इ.) रूपांची घटना, समास, अभ्यास, प्रत्यय, पद(रूप)स्वनिमिकी.

व्याकरण : २. वाक्यविन्यासविश्लेषण :

वाक्यातंत प्रथमोपस्थित घटक व त्यांचे विश्लेषण; व्याकरणिक प्रवर्ग - कार्यात्मक (कर्ता, कर्म, विधेय).

३. अर्थविन्यास : अर्थाचे स्वरूप, अर्थक्षेत्रसंकल्पना, घटकीय विश्लेषण. -

अर्थप्रकार : निर्देशनपर, गुणव्यंजक, भावपर, शैलीगत, अनेकार्थता, समानार्थता, एकनामता.

## संदर्भ - ग्रंथ


१. ध्वनिविचार - डॉ. ना. गो. कालेलकर

२. भाषा : इतिहास आणि भूगोल - डॉ. ना. गो. कालेलकर

३. भाषा आणि संस्कृती - डॉ. ना. गो. कालेलकर

४. भाषा आणि भाषाशास्त्र - डॉ. श्री. न. गजेंद्रगडकर

५. मराठीचा भाषिक अभ्यास - संपा. डॉ. मु. श्री. कानडे

६. भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक : संपा. डॉ. स. ग. मालशे, डॉ. हे. वि. इनामदार , डॉ. अंजली सोमण

७. वर्णनात्मक भाषाविज्ञान : स्वरूप आणि पध्दती - संपा. डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण

८. मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप - डॉ. सुहासिनी लद्दू

९. अर्वाचीन मराठी - डॉ. रमेश धोंगडे

१०. अभिनव भाषाविज्ञान - डॉ. ग. ना. जोगळेकर

११. भाषाविज्ञान परिचय - डॉ. मालशे , डॉ. पुंडे, डॉ. सोमण


दुसरी सहामाही:

### मराठीचा भाषिक अभ्यास (ऐतिहासिक)

१. भाषिक परिवर्तन : कारणमीमांसा, भाषिक परिवर्तनाचे स्वरूप, ध्वनि-परिवर्तन, अर्थपरिवर्तन, साम्याधिष्ठित परिवर्तन, व्याकरणिक परिवर्तन, आदान किंवा स्वीकृती (शब्दसंग्रहातील परिवर्तन), परभाषांचा मराठीवर झालेला परिणाम.

२. मराठीचा उगमकाळ व त्यासंबंधी मतमतांतरे: वैद्य-गुणे वाद.

(अ) मराठीची पूर्वपीठिका, मराठीच्या जनक भाषेसंबंधीचे वाद.

(ब) आधुनिक प्रमाण मराठीची निर्मिती

३. मराठीचा कालिक अभ्यास : कालिक अभ्यासाचे स्वरूप व महत्त्व; भाषेच्या कालविभागणीच्या विविध पद्धती; मराठीची कालविभागणी:

(अ) मराठीचा उगमकाळ ते इ.स. १३५० (मुसलमानी अंमलापूर्वीचा काळ).

(आ) इ.स. १३५० ते इ.स. १८०० (मुसलमानी अंमल व मराठेशाही).

(इ) इ.स. १८०० ते १९५० (अर्वाचीन काळ).

४. भाषाकुलाची संकल्पना, जागतिक भाषांची गटवार विभागणी, आर्य भाषाकुल व भारतीय भाषा, आर्य भारतीय भाषांच्या विकासाचे टप्पे, आर्य भारतीय भाषाकुल व मराठी (अंतर्वर्तुळ-बहिर्वर्तुळ सिद्धान्त).

## संदर्भ-ग्रंथ


१. मराठी भाषा : उद्गम आणि विकास - कृ.पां. कुलकर्णी

२. महाराष्ट्र भाषाभ्यास-य.रा.दाते, चिं.ग.कर्वे.

३. मराठी भाषेचा विकास-ज्यूल ब्लोक (अनु. -वा.गो.परांजपे)

४. भाषा: इतिहास आणि भूगोल-डॉ.ना.गो.कालेलकर

५. भाषाविज्ञान: वर्णनात्मक आणि ऐतिहासिक - डॉ.स.गं.मालशे, डॉ.हे.वि.इनामदार, डॉ.अंजली सोमण

६. यादवकालीन मराठी भाषा- डॉ.शं.गो.तुळपुळे

७. पेशवे दप्तरातील मराठी भाषेचे स्वरूप-डॉ.गं.ब.ग्रामोपाध्ये

८. मराठीचा भाषिक अभ्यास-संपादक: डॉ.मु.श्री.कानडे

९. शब्द : उद्गम आणि विकास-कृ.पां.कुलकर्णी

१०. मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप : डॉ.यू.म.पठाण.

११. मराठी भाषेचे मूळ : विश्वनाथ खैरे


## प्रश्नपत्रिका ४-विशेष स्तर : ऐच्छिक

## अलंकार आणि छंद

**उद्देश:**

१. साहित्याच्या व्यवच्छेदक लक्षणांच्या संदर्भात अलंकार आणि छंद या दोन संकल्पना समजावून घेणे.

२. अलंकार आणि छंद या दोन संकल्पनांचे स्वरूप जाणून घेणे, साहित्यातील त्यांचे स्थान निश्चित करण्याची क्षमता निर्माण करणे.

३. मराठीतील अलंकार व छंदाविषयक विचारांची माहिती करून घेणे.

४. भारतीय आणि पाश्चात्य साहित्यशास्त्रातील अलंकार आणि छंद यासंबंधीच्या विचारांचा परिचय करून घेणे.

५. काही महत्त्वाचे अलंकार आणि छंद यांचा सोदाहरण अभ्यास करणे.

**पहिली सहामाही: अलंकार**

१. अलंकार: संकल्पनेचे स्वरूप व व्याख्या

अलंकार संज्ञेचा अर्थ व विकास: 'अलंकार' संज्ञेच्या विविध व्याख्या.

अलंकाराचे स्वरूप, अलंकाराचे अलंकारत्व सिद्ध होण्यासाठी आवश्यक तत्त्वे

अलंकार आणि स्वभावोक्ती

अलंकाराच्या मुळाशी असलेली तत्त्वे : वक्रोक्ती, वैचित्र्य, चमत्कृती, अतिशयोक्ती, अप्रस्तुतप्रशंसा, औपम्य.

अलंकार संकल्पनेची संस्कृतातील पूर्वपीठिका, लक्षण व अलंकार परस्परसंबंध-साम्यभेद, गुण व अलंकार परस्परसंबंध-साम्यभेद, प्रतिमान व अलंकार.

२. अलंकार-अलंकार्य संबंध

अलंकारांचे बहिरंगत्व, काव्याशयाशी एकरूप झालेले अलंकार.

नित्यानित्यविवेक-अलंकारांचे काव्यातील कार्य.

अलंकार आणि काव्यानुभव.

अलंकाराच्या ग्राह्यत्वाच्या कसोट्या, शब्दालंकार-अर्थालंकार यांच्या योजनेतील औचित्य.

३. अलंकार संख्या

अलंकाराच्या वाढीमागील भूमिका, संख्येवर नियंत्रण ठेवण्याची शक्यता व आवश्यकता.

आधुनिकांनी मानलेले नवे अलंकार.

४. मराठीतील अलंकारविषयक चर्चेचा इतिहास.

वाळूताई खरे, के.ना.वाटवे, ग.त्र्यं.देशपांडे, रा.श्री.जोग, द.के.केळकर, म.वा.धोंड, रा.शं.वाळिंबे, रा.अ.काळेले, कृ.श्री.अर्जुनवाडकर, अरविंद मंगरूळकर यांच्या विचारांचा आढावा.

५. संस्कृतातील आलंकारिकांचे विचार

भरत, भामह, दण्डी, वामन, कुंतक, आनंदवर्धन, अभिनवगुप्त, मम्मट, अप्पय्यदीक्षित, जगन्नाथ

६. पुढील अलंकारांचे विवेचन :

उपमा, अनन्वय, उपमेयोपमा, स्मरण, रूपक, ससंदेह, भ्रांतिमान, अपह्नुती, उत्प्रेक्षा, अतिशयोक्ती, व्यतिरेक, सहोक्ती, तुल्ययोगिता, प्रतिवस्तूपमा, दृष्टान्त, निदर्शना, समासोक्ती, आक्षेप, अप्रस्तुतप्रशंसा, व्याजस्तुती, पर्यायस्तुती, पर्यायोक्ती, परिकर, अर्थान्तरन्यास, श्लेष, विरोध, विभावना, विशेषोक्ती, विषम, व्याघात, एकावली, मालादीपक, सार, यथासंख्य, प्रत्यनीक, प्रतीप, मीलित, तद्गुण, स्वभावोक्ती, भाविक, संसृष्टी, संकर.

## संदर्भ ग्रंथ

१. अलंकार प्रदीप : डॉ. ग.त्र्यं.देशपांडे, पु.गो.निजसुरे

२. काव्य विभ्रम : प्रा.रा.श्री.जोग.

३. अलंकार मंजूषा : वाळूताई खरे.

४. काव्याची भूषणे : म.वा.धोंड.

५. नवे अलंकार : रा.अ.काळेले.

६. भारतीय साहित्यशास्त्र : डॉ.ग.त्र्यं.देशपांडे.

७. भारतीय काव्यशास्त्राची उत्क्रांती : डॉ.सां.क.लेले.

८. काव्यप्रकाश : संपा:कृ.श्री. अर्जुनवाडकर, अरविंद मंगरूळकर.

९. Sanskrit Poetics : सुशीलकुमार डे.

१०. काव्यालोचन : द.के.केळकर.

दुसरी सहामाही : छंद

छंद: स्वरूप आणि संकल्पना, छंद या संज्ञेची व्याप्ती, गद्य व पद्य यांतील भेद.

छंदामागील मूलतत्त्व : ताल व लय संकल्पना.

उच्चारभार ( Accent,) आघात (Stress), नादप्रक्रिया ( Intonation ), यति, यमक यांचे छंदोरचनेतील कार्य.

छंद आणि काव्य : परस्परसंबंध, विशिष्ट भावबंध व विशिष्ट छंद यांतील अनुबंध व संकेत, यमक व छंद. छंद व शैली : परस्परसंबंध,

वृत्त जाती, मुक्तछंद, छंद यामागील तत्त्वे, गणरचना इ. चे. स्वरूप.

मराठी छंदोरचनेची पूर्वपीठिका :

पुढिलांचा विचार - वैदिक, पिंगल, भरत, हेमचंद्र, प्राकृत, अपभ्रंश-रचना, प्राचीन मराठी छंद, लौकिक (लोकवाङमयातील) छंद.

मराठीतील छंदोविचारांचा परामर्श.

परशुरामपंततात्या गोडबोले, वि.का.राजवाडे, माधवराव पटवर्धन, ना.ग.जोशी, रा.श्री.जोग, आ.रा.देशपांडे इत्यादींचे विचार.

प्रमुख छंद:प्रकार

ओवी, अभंग, घनाक्षरी, इंद्रवज्रा, उपेन्द्रवज्रा, मालिनी, शालिनी, भुजंगप्रयात, वसंत-तिलका, शिखरिणी, चामर, पृथ्वी, शार्दूलविक्रीडित, उपजाती, शुभवदना, वियोगिनी, पुष्पिताग्रा, बालानंद, उद्धव, भूपती, पादाकुलक, हरिभगिनी, दोहा, नववधू, प्रणय-प्रभा, दिंडी, आर्या, अनुष्टुभ्, वैनायक वृत्त, मुक्तशैली, मुक्तछंद, गझल, गझलातून निर्माण झालेल्या जाती.

## संदर्भ ग्रंथ

पद्यप्रकाश - मा.त्रिं.पटवर्धन.
छंदोरचना - मा.त्रिं.पटवर्धन.
मराठी छंदोरचना (लयदृष्ट्या पुनर्विचार) - ना.ग.जोशी.
मराठी छंदोरचनेचा विकास - ना.ग.जोशी.
तुलनात्मक छंदोरचना - ना.ग.जोशी.
काव्यविभ्रम - रा.श्री.जोग.
पद्यमीमांसा - वि.ज.सहस्त्रबुध्दे.
मराठी छंद - वि.का.राजवाडे.

## प्रश्नपत्रिका ४ – विशेष स्तर : ऐच्छिक

## १९४५ नंतरचे वाङ्मयीन प्रवाह

**उद्देश :**

(१) एखाद्या विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासाच्या संदर्भात तात्त्विक भूमिका तयार करणे.

(२) अशा अभ्यासाच्या व्याप्तीबाबत जाण निर्माण होण्यास मदत करणे आणि अशा व्याप्तीत अभ्यास करण्याची क्षमता वाढविणे.

(३) समकालीन साहित्यातील विविध प्रेरणा, प्रवृत्ती आणि प्रवाह यांचा अभ्यास करणे, आणि असा अभ्यास करण्याची क्षमता वाढविणे.

(४) विशिष्ट कालखंडात होणाऱ्या वाङ्मयीन बदलांचे स्वरूप न्याहाळणे, बदलांची कारण-मीमांसा करणे आणि कारण-मीमांसा करण्याची क्षमता वाढविणे.

(५) बदलते जीवनसंदर्भ व नव्या वाङ्मयप्रकारांची निर्मिती यांचा अन्योन्य संबंध तपासून पाहणे. असा अन्योन्यसंबंध शोधण्याची व तपासण्याची क्षमता वाढविणे.

(६) समकालीन साहित्यातील निवडक साहित्यकृतींच्या आधारे वरील घटकांचे विश्लेषण करणे.

पहिली सहामाही :

१. वाङ्मयीन प्रवाह म्हणजे काय ? वाङ्मयीन प्रवाह का व कसे निर्माण होतात ? प्रवाहातील कालतत्त्व, समाज, परिस्थिती, प्रवृत्ती इत्यादी घटक.

२. १९४५ नंतरच्या काळात मराठी साहित्यात आलेल्या नवतेच्या प्रवाहातील मौलिकता (Originality) व आधुनिकता (Modernity) यांचे विवेचन - या प्रवाहांचा उदाहरणांसह अभ्यास.

३. १९४५ नंतरच्या साहित्याच्या संदर्भात निर्माण झालेले प्रश्न - विफलता, दुर्बोधता, अश्लीलता, वाङ्मयप्रकारांच्या संकल्पनातील बदल इ.

**दुसरी सहामाही :**

ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, विज्ञान साहित्य इ. प्रवाहांचे विवेचन. या सर्व प्रवाहांच्या वैशिष्ट्यांचा सोदाहरण अभ्यास.

प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, देशी साहित्य, जनवादी साहित्य , विज्ञान साहित्य.

### संदर्भ ग्रंथ :

१. मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप – संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर.

२. वाङ्मयेतिहासाची संकल्पना - संपादक: द. दि. पुंडे.

३. परंपरा आणि नवता – गो. वि. करंदीकर.

४. ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव - डॉ. आनंद यादव.

५. ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि समस्या - डॉ. आनंद यादव.

६. संशोधनाची क्षितिजे - (अमेय प्रकाशन) संपा. - भास्कर लक्ष्मण भोळे.

७. दलित कविता - म.सु.पाटील.

८. दलित साहित्य - एक आकलन - बाळकृष्ण कवठेकर.

९. दलित साहित्य - वेदना आणि विद्रोह - भा.दि.फडके.

१०. मराठी कविता (१९४५ ते १९६५) - रा.श्री.जोग.

११. जनवादी साहित्य - या.वा.वडस्कर.

१२. समकालीन साहित्य - (द.भि.कुलकर्णी, गौरवग्रंथ).

१३. यक्षाची देणगी - डॉ.जयंत नारळीकर (प्रस्तावना).

१४. साद पडसाद - प्रा.गो.म.कुलकर्णी.

१५. दलित साहित्य : सिध्दान्त व स्वरूप - डॉ.यशवंत मनोहर

१६. खडक आणि पाणी - गंगाधर गाडगीळ (उत्तरार्ध).

१७. मर्ढेकरांची कविता - धों.वि.देशपांडे.

१८. प्रदेश साकल्याचा - त्र्यं.वि.सरदेशमुख.

१९. सौंदर्य आणि साहित्य - बा.सी.मर्ढेकर.

२०. ग्रामीण साहित्य : एक चिंतन- द.ता.भोसले.

## प्रश्नपत्रिका ४ : विशेष स्तर – ऐच्छिक

## लोकसाहित्य व मराठी लोकसाहित्य

**उद्देश :**

लोकसाहित्याचे स्वरूप समजून घेणे, लोकसाहित्याची व्यापकता व सर्वसमावेशकता लक्षात घेणे, लोकसाहित्यातील विविध प्रकार व त्या साहित्यातील सामाजिक, धार्मिक (साहित्यबाह्य) जाणिवा स्पष्ट करणे.

**पहिली सहामाही :**

१. लोकसाहित्याची संकल्पना :

(अ) लोकसाहित्याची व्याख्या : लोकसाहित्यातील 'लोक' व 'साहित्य' या दोन पदांचे स्पष्टीकरण.

(आ) लोकसाहित्य व ग्रांथिक साहित्य यांमधील संबंध

१ लोकसाहित्य व महाकाव्य  २ लोकसाहित्य व संतसाहित्य  ३ लोकसाहित्य व अर्वाचीन साहित्य

(इ) लोकसाहित्याचे सामाजिक, राष्ट्रीय व सांस्कृतिक जीवनाशी असलेले अनुबंध

२. लोकसाहित्याचा अभ्यास :

(अ) लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता.

(आ) लोकसाहित्याच्या अभ्यासास इतर शास्त्रांचे साहाय्य : इतिहास, पुरातत्त्व, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी.

(इ) लोकसाहित्याच्या अभ्यासातील अडचणी व अभ्यासकाने पाळावयाची पथ्ये :

(ई) मराठीतील लोकसाहित्याच्या अभ्यासाची परंपरा : साने गुरुजी, कमलाबाई देशपांडे, सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, मालतीबाई दांडेकर वामनराव चोरघडे, रा.चिं.ढेरे, प्रभाकर मांडे, गं.ना.मोरजे, नामदेव व्हटकर, वि.कृ.जोशी यांच्या लोकसाहित्यविषयक कार्याचा परिचय.

३. लोकसाहित्यातील समाजदर्शन व संस्कृतिदर्शन :

महाराष्ट्रातील जीवन व लोकतत्त्व : लोकसमजुती, रूढी, विधिविधाने, मंत्रतंत्र, लोकभ्रम, लोककला, सामाजिक व धार्मिक संकेत, मिथ्यकथा, (myth) आवर्तक कल्पनाबंध (motif), प्रादेशिक विशेष.

**दुसरी सहामाही :**

मराठीतील लोकसाहित्याचे प्रकार, रचनाविशेष व त्याचे प्रस्तुतीकरण (Presentation)

(अ) लोकगीत, (आ) लोककथा, (इ) लोकनाट्य, (ई) लोकसाहित्य व गोंधळ.

(अ) लोकगीत : उत्पत्तिविषयक विविध उपपत्ती, लोकगीत व (लौकिक) गीत यांतील अंतर, लोकगीतांचे प्रमुख प्रकार - स्त्रीगीते, नृत्यगीते, अंगाई गीते, धार्मिक विधी गीते, विवाहादी संस्कार इ. निमित्ताने व्यक्त झालेली लोकगीते, विविध जमातींची गीते - धनगरी, कोळी इ.

(आ) लोककथा : लोककथांचे मूलस्रोत, लोककथांच्या उत्पत्तीसंबंधी विविध उपपत्ती ; लोककथांची वैशिष्ट्ये, लोककथांचे प्रकार, लोककथा व लघुकथा : परस्पर संबंध.

(इ) लोकनाट्य : नाटक व लोकनाट्य, पथनाट्य व लोकनाट्य यांतील अनुबंध - परस्पर संबंध.

लोकनाट्याचे घटक व लोकरंगमंचाचे स्वरूप : -

दशावतार, कीर्तन, लावणी, पोवाडा, ललित, गोंधळ, भारूड, तमाशा – यांच्या विशेष संदर्भात.

२. लोकसाहित्याचे कलात्मक सौन्दर्य

गीत, नृत्य, साहित्य, चित्र, इ. कलाप्रकारांच्या सहभागाचे कार्य.

३. लोकसाहित्य संकलन : पध्दती व अडचणी

## संदर्भ ग्रंथ :

१. The Science of Folklore - Alexander and A.Krappe.

२. Introducing Folklore - Kenneth & Mary Clarke.

३. लोकसाहित्याची रूपरेषा - दुर्गा भागवत.

४. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह - प्रभाकर मांडे.

५. अर्धा रूपेरी वाङ्मय - कमलाबाई देशपांडे.

६. लोकसाहित्याचे लेणे - मालती दांडेकर.

७. साहित्याचे मूलधन - द.श्री.कालेलकर आणि वा.कृ.चोरघडे.

८. मराठीतील स्त्रीधन - सरोजिनी बाबर.

९. मराठीतील लोककथा - सरोजिनी बाबर.

१०. मराठी तमाशा - नामदेव व्हटकर.

११. मराठी लोकसंस्कृतीचे उपासक - रा.चिं.ढेरे.

१२. लोकसाहित्याचे स्वरूप - डॉ.प्रभाकर मांडे.

१३. लोकसाहित्य : स्वतंत्र अभ्यास क्षेत्र - गं.ना.मोरजे.(दास्तान प्रकाशन)

१४. लोकसाहित्य : कलाविचार - गं.ना.मोरजे(पुणे विद्यापीठ प्रकाशन).

१५. नाचू कीर्तनाचे रंगी - डॉ.यशवंत पाठक.

१६. भारतीय मिथ्यांचा मागोवा - विश्वनाथ खैरे.

१७. आदिवासी कलाविश्व - गोविंद गारे.

१८. आदिवासी संशोधन पत्रिका - जानेवारी १९८६, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

१९. लोकनाट्याची परंपरा - वि.कृ.जोशी.

२०. लोकसाहित्य संपदा - ना.रा.शेंडे.

२१. लोकसाहित्य : उद्गम आणि विकास - डॉ.शरद व्यवहारे.

२२. लोकसंस्कृतीची क्षितिजे - रा.चिं.ढेरे.

## प्रश्नपत्रिका ४ : विशेषस्तर : ऐच्छिक

## मराठीचे पारंपरिक व्याकरण

**उद्देश :**

व्याकरणशास्त्राचा परिचय करून देणे, व्याकरणविषयक विचारांची वाटचाल, मराठी व्याकरणरचनांच्या आधारे समजून देणे व मराठीतील व्याकरणविषयक प्रश्नांची आतापर्यंत जी चर्चा झाली तिचा परिचय करून देणे, आणि सर्व विषयांबाबत शास्त्रीय चिकित्सा करण्याची क्षमता वाढविणे.

पहिली सहामाही :

१. (अ) व्याकरण म्हणजे काय ?

(आ) व्याकरणाची व्याप्ती व मर्यादा, भाषाभ्यासात व्याकरणाचे स्थान, शुद्धाशुद्धविवेक, व्युत्पत्तिविचार, शब्दसिद्धीविचार, सामासिक शब्द, अभ्यस्त शब्द, वाक्यपृथक्करण हे विषय व्याकरणाच्या कक्षेत येतात की नाही ?

(इ) व्याकरण व भाषा : परस्परसंबंध.

व्याकरणरचनेचे व अभ्यासाचे प्रयोजन.

(ई) व्याकरणाचे प्रकार - आदेशात्मक, वर्णनात्मक, तुलनात्मक व ऐतिहासिक.

२. मराठीचा वर्णविचार :

वर्णसंकल्पना, रूढ वर्णमालेची चिकित्सा, वर्णांच्या वर्गीकरणामागील तत्वे, वर्णसंख्या - ऱ्हस्व-दीर्घभेद, स्वर-व्यंजन उच्चार भेद, अनुस्वार व अनुनासिक यांतील भेद, मराठीची वर्ण-व्यवस्था.

३. मराठीचा शब्दविचार :

शब्दाची व्याख्या, शब्दजातीचे निकष, शब्दजातीची संख्या : -

नाम : व्याख्या आणि विभागणी, सर्वनाम : व्याख्या आणि विभागणी, विशेषण : व्याख्या आणि विभागणी.

धातू : व्याख्या आणि विभागणी: सकर्मक, अकर्मक, शक्य, प्रयोजक इत्यादी.

क्रियाविशेषण अव्यय : व्याख्या आणि विभागणी, शब्दयोगी अव्यय : व्याख्या आणि विभागणी, उभयान्वयी अव्यये आणि केवलप्रयोगी अव्यये.

दुसरी सहामाही :

१. मराठीचा विकरणविचार :

(अ) लिंग, वचन, पुरुष, इत्यादी विकारसरणीचा विचार.

(आ) विभक्ति-विचार : विभक्ती म्हणजे काय, विभक्ती मानण्याचे निकष : अर्थ की प्रत्यय, कारकार्थ आणि उपपदार्थ, विभक्तींची संख्या, विभक्तींची नावे, षष्ठी व द्वितीया यांच्या संदर्भातील वाद, सविकरण विभक्ती, सामान्यरूप म्हणजे काय ? विभक्ती प्रत्यय व शब्दयोगी अव्यये यांच्यामधील साम्यभेद, विभक्ती-विचारातील ग्राह्याग्राह्यता.

(इ) आख्यातविचार : आख्यात म्हणजे काय ? आख्यातांचे निकष कोणते - अर्थ की प्रत्यय ? आख्यातांची नावे अर्थपूर्ण की निरर्थक ? आख्यात संख्या, आख्यातार्थ, संयुक्त क्रियापदे.

(ई) साधक प्रत्यय (धातुसाधित प्रत्यय इत्यादी)

२. प्रयोगविचार :

प्रयोग म्हणजे काय ? कर्ता, कर्म, व क्रियापद यांचे मूळ स्वरूप, तीन प्रयोग ( कर्तरी, कर्मणी, भावे), संकरित प्रयोग व प्रयोग यांची तुलना.

३. वाक्यविचार :

वाक्याची व्याख्या (रूप व अर्थ दृष्टीने)

वाक्यांचे प्रकार : केवल, मिश्र, संयुक्त, वाक्य पृथक्करण, उद्देश, विधेय इ.

४. मराठीतील व्याकरण विचाराची वाटचाल :

संस्कृत, इंग्रजी व्याकरण-रचनांचा मराठी व्याकरण-रचनांवरील परिणाम, मराठी व्याकरणाच्या पुनर्विचाराची आवश्यकता व दिशा.

मराठी व्याकरण रचनाकारांचे कार्य.

## संदर्भ ग्रंथ


१. शास्त्रीय मराठी व्याकरण : मो.के.दामले.

२. मराठी व्याकरणावरील निबंध : कृष्णशास्त्री चिपळूणकर.

३. मराठी व्याकरणाची मूलतत्त्वे : ग.ह.केळकर.

४. आधुनिक मराठीचे उच्चतर व्याकरण: म. पां. सबनीस

५. मराठी व्याकरणाचा पुनर्विचार: अरविंद मंगरूळकर

६. मराठीचे अंतरंग : गो.कृ.मोडक

७. महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका: संपा.कृ.श्री.अर्जुनवाडकर

८. मराठी व्याकरण:काही समस्या : डॉ.प्र.ना.दीक्षित

९. मराठी व्याकरणाचे व्याकरण: कृ.पां.कुलकर्णी, ग.मो.पाटील

१०. मराठीचे व्याकरण : डॉ.लीला गोविलकर

११. मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद : कृ.श्री.अर्जुनवाडकर

१२. मराठी व्याकरणाची कुळकथा : अ.का.प्रियोळकर

१३. मराठी व्याकरणकार व व्याकरण प्रबंधकार : मो.स.मोने

१४. मराठी भाषेची घटना-रा.भि.जोशी

१५. मराठीच्या प्रमाण भाषेचे स्वरूप-सुहासिनी लद्दू


## प्रश्नपत्रिका ५ : सामान्य स्तर

## साहित्यकृतींचा अभ्यास

उद्देश:

१. विशिष्ट साहित्यकृतींचा स्वतंत्र साहित्यकृती म्हणून अभ्यास करण्याची दिशा आणि व्याप्ती यांची समज निर्माण होण्यास मदत करणे, अशा अभ्यासाची क्षमता वाढविणे.

२. लेखकाच्या इतर निर्मितीच्या संदर्भात विचार करून विशिष्ट साहित्यकृतीचे वैशिष्ट्य शोधता येण्याची क्षमता वाढविणे.

३. कालखंड समकालीन प्रवाह, साहित्यप्रकार यांच्या संदर्भात विशिष्ट साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास करणे आणि अशा अभ्यासाची क्षमता वाढविणे.

४. आशय व अभिव्यक्ती यांच्या संदर्भात विशिष्ट साहित्यकृतींचे स्वरूप व वैशिष्ट्ये यांचा शोध घेणे व असा शोध घेण्याची क्षमता वाढविणे.

**अभ्यासक्रम:**

१. पहिल्या सहामाहीत तीन व दुसऱ्या सहामाहीत तीन अशा एकूण सहा साहित्यकृतींचा अभ्यास अभिप्रेत आहे.

२. पुढील कालखंडानुसार वेळोवेळी साहित्यकृती नेमण्यात येतील.

कालखंड: -

(१) प्रारंभ ते १६००  - दोन साहित्यकृती

(२) १६०१ ते १८००

(३) १८०० ते १९२०  प्रत्येकी एक साहित्यकृती.

(४) १९२० ते १९६०

(५) १९६० ते अद्ययावत

नेमलेली क्रमिक पुस्तके

(१९८९-९० व १९९०-९१)

**पहिली सहामाही :**

१. ज्ञानेश्वरी, अध्याय १७वा.

२. लीळाचरित्र-उत्तरार्ध भाग २ संपा. शं. गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन, पुणे.

३. रामजोशीकृत लावण्या.

**दुसरी सहामाही :**

१. भाऊबंदकी - कृ. प्र. खाडिलकर.

२. चोरघडे यांची कथा - कॉन्टिनेंटल प्रकाशन.

३. खूणगाठी - रा. प. देशपांडे, मौज प्रकाशन.

(टीप : - एम. ए. ना अभ्यासक्रम हा दोन वर्षांचा असतो म्हणून ही पुस्तके दोन वर्षांसाठी नेमण्यात यावीत असे ठरविण्यात आले.)

## प्रश्नपत्रिका ६ : विशेषस्तर

## समीक्षाविचार आणि साहित्यसमीक्षा

उद्देश :

(१) साहित्यविचार आणि साहित्यसमीक्षा-व्यवहार यांच्यामधील परस्पर-संबंधांची जाण वाढीस लावणे.

(२) साहित्य समीक्षा विचार व साहित्य समीक्षा व्यवहार आणि इतर ज्ञान-भाव-व्यवहार (वैज्ञानिक, तत्त्वज्ञानात्मक, मानसशास्त्रीय, सामाजिक) यांतील साम्यभेदांची समज वृध्दिंगत करणे.

(३) एकूण भाषिक व्यवहार (दैनंदिन, व्यावहारिक, संदेशनात्मक, शास्त्रीय, ज्ञानात्मक, तार्किक, भावात्मक, व्यक्तिनिष्ठ, वस्तुनिष्ठ) आणि वाङ्मयीन-कलात्मक भाषाव्यवहार यांच्या स्वरूपांतील साम्यभेदाचे आकलन होऊन त्यांच्या उपाययोजनांची क्षमता वाढविणे.

(४) साहित्यिक, साहित्यकृती, कलानुषंगिक निर्मिती, प्रकारानुषंगिक निर्मिती, यांच्या उचित पार्श्वभूमीने साहित्याची स्वरूपानुसारी तौलनिक चिकित्सा करण्यासाठी आवश्यक ते वैचारिक आणि व्यावहारिक भान समृद्ध करणे.

(५) साहित्य आणि साहित्यकृती यांची विविध संदर्भांनी समर्पक समीक्षा करण्याची दृष्टी व क्षमता समृद्ध करणे.

**पहिली सहामाही :**

(१) साहित्य समीक्षेची संकल्पना.

(२) साहित्य समीक्षेची प्रयोजने आणि कार्ये.

(३) समीक्षकाची साधना : काही अंगे.

(४) वाङमयीन समीक्षेची पथ्ये.

१. साहित्य समीक्षेची संकल्पना

समीक्षा म्हणजे काय ?, साहित्य आणि समीक्षा : संबंध, साहित्य विचार आणि समीक्षा : संबंध, साहित्य विचार आणि समीक्षा विचार : संबंध, समीक्षा विचार आणि समीक्षा : संबंध, साहित्य समीक्षेची आवश्यकता, समीक्षा शास्त्र की कला ?, समीक्षेशी संबंधित घटक : लेखक, वाचक व साहित्यकृती.

